
ISSN 2394-5303

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया™

Issue-29, Vol-01, May-2017



Editor

Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

14) Impact of Learning Environment on Metacognition of Higher Secondary Students
Ms. Kuldeep Kaur, Allahabad || 56

15) तेलंगणा राज्याची चळवळ
माधव चोले, देगलूर || 59

16) नोवेल स्मिथचे नैतिक चिंतन
डॉ. संजय ह. पाटील, देगलूर. || 64

17) अहिराणी : मराठीची एक लक्षणीय बोली
डॉ. सदाशिव सरकटे, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई || 67

18) आजची मराठी कादंबरी : एकदर्शन
डॉ. अरुण कोळी-प्रा. देविदास शिंदे || 71

19) सालगडी:एक अभ्यास
प्रा. डॉ. के. एम. भांगे—दिपक तुकाराम आचार्य || 75

20) वारकरी पंथाच्या आचारधर्माची तत्त्वे
प्रा.डॉ.एच.डी.आकोटकार, खामगांव, जि.बुलडाणा || 81

21) ग्रामीण जीवनातील बदल (स्थित्यंतरे)
डॉ. अरुण कोळी-प्रा. देविदास शिंदे || 85

22) कपालभाती आणि अनुलोम—विलोम, प्राणायमाचा खो—खो खेळांडूच्या शारीरिक क्षमतेवर होणारा प्रभाव
प्रा.नाजुकराम दिनानाथ बनकर, लाखनी, जि. भंडारा || 87

23) शारीरिक क्षमते करीता परिपथ प्रशिक्षणाची आवश्यकता
प्रा.नरेश पांडुरगजी बोरकर, भंडारा || 90

24) शरीरातील शक्ती-केंद्रे-किंवा चक्र-
प्रा.डॉ चाऊस एस ए.—प्रा. श्री. भवर बी.जी. || 93

25) आंग्रे घराण्याच्या कौटुंबिक कलहात पेशव्यांची भूमिका
प्रा. राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे, देऊळगाव राजा, जि. बुलडाणा || 95

26) शारीरिक शिक्षणातील सर्वेक्षण संशोधन पद्धती
प्रा. डॉ. बाबुराव लक्ष्मनराव घायाळ, नांदेड || 99

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

16

# नोवेल स्मिथचे नैतिक चिंतन

डॉ. संजय ह. पाटील
(तत्वज्ञान विभागप्रमुख)
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**********

नोवेल स्मिथ यांनी नीतिशास्त्रातील जटील आणि मलुभूत प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एक नवीन तार्किक पध्दती निर्माण केली. या पध्दतीमुळे अनेक नीतीज्ञ प्रभावित झाले होते. नीतिशास्त्र ह्या पुस्तकाच्या योगदानामुळे नोवेल - स्मिथची गणना जी ई. मूर, बर्गेसो हॉर्टमेने, हेअर, स्टिव्हसन सारख्या नीती विचारवंतांमध्ये होऊ लागली. प्रस्तुत ग्रंथाचे एकूण तीन विभाग केले आहेत.

नीतिशास्त्र या पूस्तकाच्या माध्यमातून नोवेल स्मिथची भूमिका आपल्यासमोर येते. नैतिक प्रश्न इतके गुंतागुंतीचे का आहेत ? असा प्रश्न उपस्थित करुन ह्या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी त्यांनी नवीन तात्विक पध्दतीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. नोवेल - स्मिथचा विश्वास आहे की, या पध्दतीच्या वापरामूळे नैतिक समस्यांची उकल होऊ शकेल.

द्वितीय विभागात ह्या तात्वज्ञानिक पध्दतीचा वापर पारंपारिक नैतिक समस्यांची उकल करण्याचा एक प्रयत्न केला आहे. ह्या प्रयत्नाचे यश ही पध्दती प्रत्येक प्रसंगी वापरण्यावर अवलंबून नाही. खरा मुलभूत प्रश्न असा आहे की, ह्या पध्दतीच्या वापरामुळे नैतिक चिंतनात वास्तविकपणे कितपत प्रगती होऊ शकेल किंवा यामुळे मुलभूत नैतिक समस्यांची सोडवणूक समाधानकारक होऊ शकेल किंवा नाही हा होय.

ह्या ग्रंथामागची भूमिका अशी नोवेल - स्मिथने जी नवीन अधिक विकसित आणि प्रगल्भ तात्वज्ञानिक पध्दती नैतिक प्रश्नांची उकल करण्यासाठी वापरली आहे. या ग्रंथाला सुप्रसिध्द अनुभववादी विचारवंत जी प्रस्तावना लिहीली त्यांत त्यांनी नैतिक उपदेशक आणि नैतिक तत्वज्ञ असा भेद केला आहे. नीतिशास्त्रज्ञ आपल्यासमोर नैतिक आचार संहिता ठेवतो. आणि आपण त्या संहितेचे पालन करावे ह्यासाठी तो आपणास प्रोत्साहन देतो. नीतिशास्त्रज्ञाची भूमिका अशी असते. याउलट नैतिक तत्वज्ञ हा नैतिक निर्णयाचे स्वरुप विशद करीत असतो. मी कोणत्या प्रकारच्या आचारसंहितेचे पालन केले पाहिजे?

नोवेल - स्मिथने सुरुवातीपासूनच नीतिशास्त्राचा समावेश व्यावहारिक विमर्षात केला आहे. व्यावहारिक क्षेत्रात कर्त्यासमोर एक प्रश्न वारंवार निर्माण होतो तो असा, मी आता आणि यावेळी काय करणे योग्य ठरेल? तत्वज्ञ हाच प्रश्न वेगळ्या स्वरुपात आपल्या समोर उपस्थित करतो की, या विशिष्ट प्रश्नाला तो अधिक सामान्य रुपात उपस्थित करतो. मी काय करणे उचित ठरेल? माझ्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे का? नीतिशास्त्रात स्त्रोत वारंवार उत्पन्न होणाऱ्या ह्या समस्या आहेत.

नीतिशास्त्र हे व्यावहारिक शास्त्र असून देखील ते या प्रश्नांचे उत्तर देऊ शकत नाही. त्याचे सरळ-सरळ कारण असे की, नैतिक तत्वज्ञ या समस्यांची उत्तरे देऊ शकत नाही. आमचे व्यावहारिक चिंतन प्रगल्भ नसल्यामुळे अशा समस्या पुन्हा-पुन्हा निर्माण होतात. नैतिक व्यवहारात आपण ज्या संकल्पना वापरतो, त्या संकल्पनाचा नेमका अर्थ आपण पूर्णपणे समजून घ्यावयास पाहिजे पण असे घडले नाही अशी टिका नोवेल - स्मिथने केली आहे.

'शुभ', 'उचित' 'करण्यायोग्य' 'निवड', 'कर्तव्य', 'ईच्छा', 'सुख' इ. मुलभुत नैतिक संकल्पनातील अंतर्गत संबंध हे व्यामिश्र तार्किक संबंध असतात, किंवा अर्थ तार्किक स्वरुपाचे असतात. त्याचे स्वरुप स्पष्ट केल्याशिवाय ह्या संकल्पनांचा चुकीचा वापर करणे थांबणार नाही. (भाषिक चुकीच्या वापरामुळे समस्या उद्भवतात) हे करीत असताना नोवेल-स्मिथने पारंपरिक संकल्पनाचे स्वरुप स्पष्ट केले आहे. पण त्यांनी नीतीच्या भाषेचे आधुनिक तर्कशास्त्रीय उपकरणांच्या साह्याने विश्लेषण केले आहे. हा प्रयत्न नवीन असून त्यावर व्हिटगेनस्टाईनचा प्रभाव दिसून येतो. या भूमिकेप्रमाणे प्रत्येक वाक्याचे तर्कशास्त्र स्वतंत्र असते.

नोवेल-स्मिथ, नीतिशास्त्र हे एक व्यावहारिक शास्त्र आहे. अशी भूमिका स्विकारतात. विज्ञान आणि व्यावहारिकंशास्त्र यात भेद करतात. विज्ञानात वैज्ञानिक रितीचा वापर करुन एक सुसंगत ज्ञानाची प्रणाली तयार केली जाते. नोवेल-स्मिथच्या मते केवळ अनुभवाधिष्ठित विज्ञान असते हे मान्य पण याचा अर्थ असा नाही की, अनुभवावर आधारलेलेच विज्ञान असते. व्यावहारिक विचार विमर्शाला देखील तात्विक रुप दिले जाते. त्याचे विज्ञान बनविले जाते. विज्ञान बनविण्याच्या प्रेरणेमुळे व्यावहारिकशास्त्रे देखील तात्विक शास्त्राप्रमाणेच समजले जातात. विज्ञानातील समस्यांचे उत्तर वास्तवाचे निरीक्षण करुन त्याचे साधारणीकरण उत्तर दिले जाते. पण (व्यावहारिक) नीतिशास्त्रात जे प्रश्न उपस्थित होतात त्याचे उत्तर, कर्त्याच्या संकल्पस्वातंत्र्य किंवा अन्य व्यक्तीला दिलेले आदेश, किंवा प्रोत्साहनाचे रुप धारण करतात.

नैतिक क्षेत्रातील भाषेचे कार्य काय आहे? या प्रश्नाचे उत्तरे अनेक प्रकारे देता येईल. नोवेल-स्मिथच्या भुमिकेप्रमाणे नैतिक पदांना अनेक कार्य आहेत एकाच वेळी अनेक कार्य पार पाडण्यासाठी नैतिक पदे वापरण्यात येतात. व्याख्या देवून त्या पदाची कार्य स्पष्ट

करता येत नाहीत. निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या प्रकारचे कार्य या शब्दांना असते. नीतीज्ञ हे केवळ मूल्यवाचक शब्दांचाच विचार करतात. निर्णय, निवड, टिका, श्रेणी, मुल्यमापन, उपदेश, सुचंना, प्रशंसा, उत्तेजन, Admonish, धमकी इ. प्रकारचे कार्य पाडण्यासाठी त्याशिवाय इतरही हेतुच्या पूर्णतेसाठी वापर केला जातो. हा नैतिक विमर्श अतिशय व्यमित्र स्वरुपाचा असून त्याचे स्वरुप समजण्यासाठी शब्दाचा वापर निरनिराळ्या वेळी प्रसंगी कसा केला जातो हे पाहूनच निश्चित करावे लागते. विवक्षित प्रसंगी एका शब्दाला फक्त एकच स्थिर असतो असे गृहित धरणे हे थोडे विचित्रच वाटते.

स्टिव्हनसन आणि हेअर यांच्या नैतिक उत्पत्ती एकांगी असल्यामूळे तिचा त्याग नोवेल-स्मिथने केला आहे. स्टिव्हन्सन आणि हेअर यांनी नैतिक शब्द प्रयोगांना एकच कार्य असते असे प्रतिपादन केले होते. परंतु स्मिथच्या मते वरील भूमिका स्वीकारता येत नाही.

नैतिक भाषेचे मुलमूत कार्य म्हणजे इतरांना निवड करण्यासाठी किंवा मार्गदर्शन करण्यासाठी वापरली जाते. नैतिकतेचे स्वरुप समजून घेणे म्हणजे निर्णयाचे आकलन करुन घेणे होय. नैतिक निर्णयाचे कार्य निवड व्यक्त करणे होय. नीतिची भाषा ही वर्णनात्मक नसून मूल्यात्मक स्वरुपाची असते. तिचे कार्य वर्णन नसुन 'निवड' किंवा 'कृती' करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे असते.

मी काय करावे ? मी जगण्यासाठी कोणत्या तत्वाचा स्वीकार करावा ? हे नीतिशास्त्रात अत्यंत मुलभूत प्रश्न आहेत. ही भुमिका नोवेल-स्मिथची आहे. मी कसे जगावे? माझे कर्तव्य काय आहे? हे दुय्यम दर्जाचे प्रश्न समजले जातात.

निर्णय ही संकल्पना नीतिशास्त्रात मध्यवर्ती संकल्पना तो मानतो. Obligation ही मान्य नाही.

1) नीतिशास्त्र व्यक्तीने 'जीवन कसे जगावे' या प्रश्नाचे उत्तर देणे अधिक महत्वाचे मानतो. नोवेल-स्मिथची महत्वाची कामगिरी म्हणजे मुल्यवाचक पदाचे तार्किक विश्लेषण करुन त्याचे कार्य काय आहे हे दाखवून देण्यात सामावलेले आहे. नैतिक शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना अनुकूल आणि प्रतिकूल वृत्ती व्यक्त करणे यावर लक्ष देणे आवश्यक कसे ठरते याची जाणीव स्मिथ करुन देतात. वरील वृत्तींना 'मार्गदर्शन' किंवा 'निवड' करण्यासाठी मदत करणे हेच मूल्यवाचक पदाचे कार्य होय ही भूमिका ते घेतात. मूल्यवाचक पदाचे हे कार्य ज्ञानात्मक, वर्णनात्मक कार्यापेक्षा भिन्न स्वरुपाचे आहे असे तो मानतो. हे एकमेव आणि निर्णायक स्वरुपाचे कार्य तो मानतो.

2) मूल्यवाचक पदाचा अनेक कार्य असतात. एकाच शब्द निरनिराळ्या प्रसंगी अनेक अर्थाने वापरला जातो.

3) Contextual implication स्वरुप स्पष्ट करताना त्यांनी तीन नियम प्रतिपादन केले असून ते नियम लवचिक आहेत.

1) ज्या संदर्भात वाक्य उच्चारले जाते त्यावर त्याचा विश्वास असतो की ते सत्य असते.

2) ज्यावर तो विश्वास ठेवतो ते चांगले आहे. त्या विधानांसाठी संयुक्तीक कारणे देतो.

3) ऐकणाऱ्यांच्या अभिरुचिशी संबंधित तो वाक्य उच्चारणारा बोलत असतो.

4) **न ज्ञानवादी :-** 'चांगले' 'युक्त' 'तव्यता' इ. शब्दाच्याद्वारे बोलणाऱ्याच्या अनुकूल वृत्तीची अभिव्यक्ती होते. नीतिशास्त्र अभिव्यक्तीशी संबंधित असून वर्णनाशी मुळीच संबंधीत नाही. For him it is the expression and not description which is concern of effect अशा अभिवृत्तीला नोवेल-स्मिथ अनुकूलता दर्शक वृत्ती अशी संज्ञा देतो. नैतिक जाणीवेच्या क्षेत्रात त्याला जे जाणवते त्याची ती वृत्ती अभिव्यक्त करतो. व्यक्तिच्या इच्छा, अभिरुची, पार्श्वभुमिचे आकलन झाल्याशिवाय तो सार्थपणे 'चांगले' 'युक्त' 'तव्यता' इ. नैतिक शब्दांचा सार्थपणे वापर करु शकणार नाही.

स्टिव्हन्सन आणि हेअर यांनी नैतिकतेच्या बाबतीत व्यक्तिसापेक्ष Subjectivist भूमिका स्विकारलेली दिसते.

Without pro-attitudes we should neither, have any use for standards noweven be able to understand what a standard was. सारांश नोवेल-स्मिथच्या मते नैतिक पदाद्वारे, शब्दाद्वारे नैतिक निर्णयाची किंवा अनुकूल किंवा प्रतिकूल वृत्तीची अभिव्यक्ती होते.

5) 'सत्य' आणि 'असत्य' ह्या विशेषणांचा हा वापर नैतिक व्यवहारात हा काही अपराध नाही. वास्तवाशी तुल्ययोगी असणे हे वैज्ञानिक विधानाची आवश्यक उपांधी समजली जाते पण नैतिक क्षेत्रात अशी प्रकारची उपाधीची आवश्यकता नाही.

वैज्ञानिक क्षेत्रातील वादविवाद हे केंव्हा बुध्दिगम्य ठरतात. जेंव्हा त्या विधानाला वस्तुनिष्ठ आणि अनुभवजन्य पुरावा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतो तेंव्हा याउलट नैतिक क्षेत्रातील वादविवाद हे अर्थपूर्ण किंवा बुध्दिगम्य केंव्हा ठरतात. जेंव्हा नैतिक तत्वासंबंधी सहमती आढळते तेंव्हा (Agreement on moral Principle).

या संदर्भातच 'सत्य' आणि 'असत्य' या शब्दाचा वापर करणे सार्थ ठरते. तो व्यक्तिसापेक्ष भूमिकाच स्वीकारतो. ह्या भुमिकेतून नैतिक आणि वैज्ञानिक क्षेत्रातील विधाने 'सत्य' आहेत असे मानतो.

नोवेल-स्मिथ दोन प्रश्नात भेद करतो. भाषिक प्रयोग सत्य असतात म्हणजे काय ? कोणत्या अटी पूर्ण असल्याशिवाय ते सत्य ठरते ? स्टिव्हन्सनचे उत्तर असे की, नैतिक-ननैतिक क्षेत्रातील P - is true is to endorse it whether is moral or non-moral त्याचा वापर निरनिराळ्या संदर्भाशी एकरुप झालेला असतो. त्याचे दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की,नैतिक निर्णयाच्या उपाययोजनाच्या अटी वैज्ञानिक क्षेत्रातील अटींपेक्षा भिन्न असतात.

1) नियम, तत्वाचे समर्थन तो उपयुक्तता या तत्वाच्या आधारे करतो.

2) नैतिक नियमाची तुलना तो सामाजिक नियमाशी करुन या नियमाच्या आधारे नैतिक नियमाचे समर्थन करतो.

सामाजिक सुव्यवस्था टिकून राहण्यासाठी नियम प्रधान उपयुक्ततावादाची पुनरर्थापना करतो.

नैतिक नियमाची आवश्यकता दोन कारणासाठी आवश्यक मानतो. वैयक्तिक जीवन सुव्यवस्थित राहण्यासाठी आणि दूरदृष्टीने विचार केल्यास वैयक्तिक हित मिळविण्यासाठी.

नैतिक कृतीचे समर्थन करण्यासाठी विवक्षित नैतिक तत्व देण्याचे टाळतो. दुसरे (सामाजिक सुव्यवस्थेनुसार) नैतिक नियम किंवा तत्वे सम्मजसापेक्ष असतात. समाजातील निरनिराळ्या व्यक्तीच्या साध्याला पुरक असे ते असतात.

**3) Goodlife :- चांगले जीवन :**

चांगल्या जीवनाची संकल्पना, त्याशिवाय वैयक्तिक इच्छा, अभिरुचि, वृत्ती इ. पार्श्वभुमि माहित असल्याशिवाय त्याचे समर्थन अशक्य ठरते.

अ) विश्लेषणाची आवश्यकता असते.
ब) नैतिकतेच्या इतिहासाचे आकलन पाहिजे.
क) ज्ञानमीमांसेची माहिती आवश्यक ठरते.
ड) माणसांच्या प्रेरणेच्या मानसशास्त्राचे पण ज्ञान आवश्यक ठरते.

4) तार्किक युक्तिवादाने नैतिक समस्यांची उकल करता येत नाही. कारण मर्यादीत अर्थाने ह्या समस्या वैयक्तिक मानसशास्त्राशी संबंधित असतात.

**सारांश :-**

1) नैतिक मतभेद कसे दूर करता येतील हा नैतिक क्षेत्रातील महत्वाचा प्रश्न होय - स्टिव्हन्सन

2) आकारिक तर्कशास्त्रात The law of contradiction ची कल्पना मान्य केली जाते. ती वैज्ञानिक क्षेत्रात वापरली जाते. पण नीतिशास्त्र आणि विज्ञानातील भेद लक्षात न घेता ह्या नियमांची कल्पना नीतिशास्त्रात देखील वापरली जाते. पण ही भूमिका नोवेल-स्मिथला अमान्य आहे.

3) तार्किक चमत्कारीकपणा योग्य स्पष्टीकरणाने दूर करता येते. यात जे काही सांगितले जाते ते व्याघाताहून कमी असते.

4) एका शब्दाला अनेक कार्य असतात, आपण जेव्हा तो शब्द वापरतो त्यावेळी सामान्यत: प्रस्तुत मानलेली कारणे उपस्थितीत नसतील तर तार्किक चमत्कारिकपणाचा दोष आपल्या पदरी येतो.

एखादी गोष्ट भयंकर आहे, असे म्हणणे ती मला आवडते यात तार्किक चमत्कारिकपणा जाणवतो.

5) तार्किक व्यंजनाचे नियम काटेकोर असतात. पण हे नियम लवचिक असतात. ते पुढीलप्रमाणे.

A) समजा एखादी व्यक्ती निवेदन करीत असेल त्यावर तिचा स्वत:चा विश्वास असतो हे गृहित धरतो. पण याचे उल्लंघन देखील होऊ शकते. तेंव्हा भाषेचा कृतक उपयोग देखील केला जातो.

B) जेंव्हा एखादी व्यक्ती निवेदन करते तेंव्हा तिच्याकडे त्याचे समर्थन करण्यासाठी सबळ पुरावा आहे. हे आपण गृहित धरुन चालतो पण कधी - कधी पुरावा नसताना देखील निवेदन केले जाते. पण हे चूक आहे.

C) वरचा जो काही सांगत असतो त्यात श्रोत्याला आस्था आहे हे गृहित धरावे लागते.

सारांश नैतिकतेस जेव्हा नैतिक शब्द, वाक्ये आणि युक्तीवाद यांच्या परस्पर संबंध काय आहेत याचे विश्लेषण करुन नैतिक मतभेदाचे निराकरण करण्याच्या प्रेरणेतून वेगवेगळ्या संकल्पनांची मदत घेतात. त्यापैकी तार्किक वैषम्याची एक कल्पना होय.

वैज्ञानिक तर्कशास्त्र आणि नैतिक विचार विमर्श यात भेद लक्षात न आल्यामुळे नीतिशास्त्रात काही कृतक (Psudo) प्रश्न निर्माण होतात तो सोडवण्याचा प्रयत्न नोवेल-स्मिथने आपल्या 'एथिक्स' नावाच्या ग्रंथात केलेला आहे.

**संदर्भ सूची :**


1) Smith - Novel - Ethics,1954.
2) C.L. Stevenson, Ethics and Language.
3) Rege M.P. Stevensonians Traditions of Ethics I.P.Q. Jan-1966 - 63 to 76.
4) Rege M.P. Idealism and Metaphysics-1966-Jan, Page No. 13 to 28.
5) रेगे एम.पी. पाश्चात्य नीतिशास्त्राचा इतिहास - समाज प्रबोधन संस्था, पूणे - 1974.
6) C.L. Stevenson, The Emotive Meanings of ethical terms - Mind - 1977.


❑❑❑